Historicity Research Journal
ISSN : 2393-8900

Impact Factor : 1.4152 (UIF)
Volume - 3 | Issue - 5 | January – 2017

# संत साहित्यातून व्यक्त झालेले विचार

प्रा. डॉ. शिवाजी तुकाराम पाटील
मराठी विभाग प्रमुख व मार्गदर्शक , मा. ह. महाडीक कला व वाणिज्य महाविदयालय मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर.



**प्रस्तावना -**

महाराष्ट्रात तेराव्या शतकात रामदेवराव यादवांची कारकीर्द होती इ.स. १२७१ ते १३०९ हा कालखंड होय. याच काळात संतानी काव्यनिर्मिती केली. यामध्ये नामदेव, ज्ञानेश्वर, गोरा कुंभार, मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, चोखामेळा, सोयराबाई, सेना न्हावी, नरहरी सोनार, सावता माळी, एकनाथ, तुकाराम, रामदास इ. संतांनी अंभग निर्मिती करुन मराठी काव्याच्या इतिहासात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. संत नामदेवाचा जन्म १२७० तर ज्ञानेश्वरांचा जन्म इ.स. १२७५. यादवांच्या काळात सुरू झालेली संत वाड. मयाची परंपरा शिवाजी महाराजांच्या काळातही चालु होती. संत वाड. मयाचे तीन कालखंड पडतात. पहिला कालखंड नामदेव ज्ञानेश्वर यांचा. नामदेवांनी १३५० मध्ये समाधी घेतली तर ज्ञानेश्वरांनी १२९६ मध्ये समाधी घेतली. ज्ञानेश्वरांच्या समाधी नंतर नामदेव दिर्घकाळ भागवत धर्माचा प्रचार - प्रसार करीत राहिले. दुसरा कालखंड संत एकनाथांचा विचार करावा लागतो. एकनाथांचा जन्म १५२० साली झाला आणि १५९८ मध्ये समाधी घेतली. तिसरा कालखंड इ.स १६०८ ते १६८१ असून तुकाराम रामदासांचा आहे. या चारशे वर्षात संतानी विपुल काव्य निर्मिती केलेली आहे. संत नामदेव आणि ज्ञानेश्वर यांच्या कालखंडात सर्वाधिक संत होऊन गेल्याचे दिसते. सर्व संत पंढरीच्या पांडुरंगाचे भक्त आहेत. पांडुरंग आणि पंढरी हेच त्यांच्या काव्य निर्मितीचे मुख्य प्रेरणा स्थान आहे.

तेराव्या शतकाच्या अखेरीला ज्ञानदेव व नामदेव यांनी सांस्कृतिक चळवळीला प्रारंभ केला. प्राप्त परिस्थितीला अनुसरुन त्यांनी समाजाला नवे विचार नवी दिशा, क्षुद्र देवतांचे पूजन, वर्ण भेद, कर्मकांड इ. मुळे समाजात सामान्य व्यक्तीचा विकास केला. ज्या काळात कर्मकांडांना उत आला होता. धर्माचे स्तोम माजले होते अशा काळात वारकरी संप्रदायाच्या जोरावर अध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. यामध्ये अठरा पगड जातीचे संत होते. संत ज्ञानदेव, नामदेव, गोरा कुंभार, सेना न्हावी, सावता माळी, जोगा परमानंद (तेली) नरहरी सोनार, विसोबा खेचर, चोखामेळा, बंका महार, दासी जनाबाई इ. संत एकत्र आले. हरि हरा भेद नाही, देव दगडात नाही तो सज्जनात आहे. असे सांगून भूताला भगवंत मानावयास प्रवृत्त केले. स्वउदधारासाठी नाममंत्र सहज सुलभ सोपा रे सांगितले. संसारात राहुन परमार्थ करता येतो हे दाखवून दिले. समाजातील जाति - व्यवस्था व शास्त्र प्रामाण्य यांना धक्का न लावता स्त्री व क्षुद्रांना आपल्यात सामाविष्ट करुन घेतले. त्यांच्या आत्मविकासाला वाट करुन दिली देव फक्त भावाचा भुकेला आहे. भक्तिचा लंपट आहे त्याला यातीकुळ लागत नाही. जाती कुळ वर्ण हे अवघेचि गा हे अकारण मानले. वर्णव्यवसायाचे भेद व्यक्तीच्या अध्यात्मिक विकासाच्या आड येत नाहीत असे सांगितले. त्यांनी आपले तत्तवज्ञान सामान्यांच्या भाषेत सांगितले. अध्यात्माच्या क्षेत्रात प्रत्येक व्यक्तिला तिच्या विकासाला वाव राहिल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात नव्या अध्यात्मिक व धार्मिक लोकशाहीचा जन्म झाला. या अध्यात्मिक लोकशाहीला संतमेळा म्हणतात.

महाराष्ट्रामध्ये वारकरी संप्रदयामध्ये भक्तिचे क्षेत्र सर्वांसाठी खुले केल्यामुळे हा संप्रदाय दृढ होत होता. या संप्रदायाने समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. वारकरी संप्रदायाला विठ्ठलाच्या रुपात एकेश्वर मांडता आला. श्री विठ्ठल हे वारकऱ्यांचे आराध्य दैवत तो अठ्ठावीस युगे विठ्ठेवर उभा आहे. वारकरी संप्रदायामध्ये अठरा पगड जातीचे संत असल्यामुळे कोणाची ही जात ईश्वर प्राप्तीच्या आड येऊ शकली नाही. अध्यात्माच्या क्षेत्रामध्ये भावनेची, जी तुंबलेली दारे होती ती उघडण्याच्या प्रयत्न केला.

बाराव्या शतकामध्ये संतानी विपुल प्रमाणात वाड.मय निर्मिती केली. ज्ञानेश्वरांनी ज्ञानयोग आणि कर्मयोग सांगितला आहे. ज्ञानेश्वरी ही त्याची साक्ष आहे. गीतेवरील ज्ञानेश्वरांचे भाष्य काव्यदृष्टया श्रेष्ठ आहे. ज्ञानेश्वरांनी "एकेश्वर वाद" सांगितला. ज्ञानेश्वरांनी वर्णव्यवस्था नाकारलेली नाही. त्यांनी समतेचा विचार सांगितला. आपल्या वाटयाला जे कर्म आलेल आहे ते निष्ठेने पार पाडले पाहिजे असे ते म्हणतात. याचा अर्थ असा, ज्या वर्णाची जी कर्तव्ये आहेत ती त्यांनी चोख बजावली पाहिजेत. असा त्यांचा आग्रह होता. ज्यांच्या वाटयाला वर्णाश्रम धर्माप्रमाणे कर्म आलेले आहे त्याचे पालन केले पाहिजे हा पारंपारिक दृष्टीकोन ज्ञानेश्वर अंगिकारतात. संत ज्ञानेश्वरांनी वर्ण

व्यवस्थेचे समर्थन केले. आपापल्या जातीचा धर्म पाळण्यात हित आहे. असे ते निक्षून सांगतात. आपला धर्म आचरणात आणण्यासाठी कितीही कठीण असला, त्यासाठी कितीही कष्ट सोसावे लागले तरी आपला धर्म कर्तव्याने निष्ठेने पार पाडावा असे ते म्हणतात.

बहुजन समाजासाठी मराठी भाषेचा पुरस्कार करुन तिचा विकास घडवून आणला. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी अशा अप्रतिम ग्रंथांची निर्मिती करुन मराठी भाषा आणि धर्म यांना अनमोल देणगी दिली. वारकरी संप्रदायाचा उत्कर्ष घडवून आणला. सामाजिक सदाचाराचा आदर्श समाजाला दिला. ज्ञानेश्वरांनी धर्माला आधुनिक उदार आणि समन्वयवादी वळण देण्याचा प्रयत्न केला त्यांनी समाजाला प्रकाश दाखवण्याचे कार्य केले. त्याचबरोबर तत्कालीन धर्मव्यवस्थेमध्ये चार्तुर्वण्य व्यवस्थेला खुप मोठे स्थान होते. धर्म म्हणजे तीर्थयात्रा, धर्म म्हणजे यज्ञयाग अशी समीकरणे होती, त्यांनी समाजाला प्रकाश दाखवण्याचे कार्य केले त्याचबरोबर तत्कालीन धर्मव्यवस्थेमध्ये चार्तुर्वण्य व्यवस्थेला खुप मोठे स्थान होते. धर्म म्हणजे तीर्थयात्रा, धर्म म्हणजे यज्ञयाग अशी समीकरणे होती. त्यांनी बहुजन समाजाच्या विकासासाठी आपले जीवन व्यतित केले. समाजप्रबोधनाचे त्यांनी कार्य केले त्यामुळे त्यांच्याविषयी नितांत आदर आहे. त्यांचे जीवन व कार्य मानवजातीसमोर एक आदर्श आहे. त्यांची ज्ञानेश्वरी महाराष्ट्राच्या घराघरामध्ये पोहोचली त्यांनी समाजाला भक्तीची नवी वाट दाखवली. ज्ञानदेवांचे विचार तत्कालीन परिस्थितीच्या दृष्टीने महत्वाचे उपयुक्त होते आणि आजही आहेत. आपल्या विचारामुळेच लोकांच्या धर्म निती संबंधीच्या कल्पनात बदल घडवून आणला. त्यांनी समाजाला सामाजिक निती शिकविली. माणसाचे मोठेपण सामाजिक प्रतिष्ठेवर किंवा जातीवर अवलंबून नसून त्याच्या व्यक्तिगत चारित्र्यावर, मनाच्या शुदधतेवर, उभे असते. हा विचार महत्वाचा वाटतो. ज्ञानदेवांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याचे समालोचन करताना ह. श्री. शेणोलीकर म्हणतात. "सत्य अंहिसा, दया, सर्वानुभूति समभाव, अमानित्व, अदंभत्व, अक्रोधत्व इ. गुणांचे स्वरुप स्पष्ट करताना वैयक्तिक आणि सामाजिक दोन्ही अंगांनी ज्ञानेश्वरीचा विचार करतात. ज्ञानेश्वरीच्या शेवटी त्यांनी पसायदान मागितलेले आहे. अमृतानुभवातून परब्रम्हाशिवाय अन्य काही एक नाही हा विचार मांडला आहे. तर चांगदेव पासष्टी तून मी आणि तु यांच्या ऐक्यप्रतिपादनाचे ज्ञानदेवांचे कौशल्य अपूर्व आहे. त्यांनी समाजाला जीवनदृष्टी काव्यदृष्टी दिली आहे.

संत वारकरी संप्रदायामध्ये संत नामदेवांचा अधिकार मोठा आहे. वारकरी संप्रदायाचे संघटक प्रसारक प्रचारक म्हणून त्यांचे कार्य महत्वाचे आहे. विरक्त उदासीन वृत्तीमुळे, विठ्ठल भक्तीमुळे ते जगावेगळे संत वाटतात. भक्तीचे महात्म्य, लोक जागृतीचे कार्य, समाज मनाची घडण उदात्त हेतुने केली नाचू किर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावु जगी या उक्तीनुसार भागवत धर्माची पताका घेऊन उत्तर महाराष्ट्र पंजाब मध्ये भक्तीचा प्रचार केला. संत नामदेव विठ्ठल भक्त होते. भक्तीविना मोक्ष नाही असे सांगून एका नामावाचून अन्य जीवनात व जगात काही नाही असे ते म्हणतात. पंढरीचे महत्व सांगून मनुष्याने आयुष्यात एकदा तरी श्री क्षेत्र पंढरीला भेट दयावी असे ते म्हणतात. पंढरीचा विठ्ठल सर्वात्मक आहे. त्याला भेटल्याशिवाय, शरण गेल्याशिवाय, जीवनाला मुक्तता नाही. संतांच्या सहवासात त्यांच्या संगतीत सुख आहे. देवाची भक्ती करावयाची असेल तर मन निर्मळ हवे. भाव शुध्द हवा. त्याच्या प्राप्तीसाठी तपश्चर्येची, रानावनात जाण्याची गरज नाही. संसारात राहुन त्याची प्राप्ती करता येते असे ते सांगतात. देव दगडात नाही तर माणसात आहे, त्यांची अभंगवानी आत्मनिष्ठ स्वरुपाची आहे. संत नामदेवांनी भक्ति परंपरेत मराठी लोक व्यवहारात, मराठी भाषेमध्ये अपूर्व योगदान दिले आहे.

मुक्ताबाईंनी नामाचे महत्त्व सांगितले. निरंतर नामस्मरण केल्याने विषय वासनेची बाधा कधी होत नाही. त्यामुळेच मुक्ताबाई संसार बंधनातुन मुक्त आहे असे म्हणते. सावता माळयाने आपला सारा व्यवसाय विठ्ठलमय करुन टाकला होता. कष्ट करिता जन्म गेला, तुझा विसर पडिला अशी आपल्या मनातली रुखरुख ते विठ्ठलाजवळ व्यक्त करतात. चोखामेळयाने विठ्ठल दर्शनाची तळमळ बऱ्याच अंभगांतुन व्यक्त केली आहे. आपल्या उपेक्षेचे दुःख अनेक अंभगातुन व्यक्त केले आहे. सेना न्हाव्याने सामाजिक निती सांगितली आहे जनाबाईने नामाचा महिमा सांगितला आहे. अनेक संतांनी आपल्या अंभगातुन हरिभक्ती, संतसंग, संतसहवास, नाम महात्म्य, सर्वाठायी समभाव, कर्तव्यनिष्ठा सांगितली आहे.

संत एकनाथांनी समाज व्यवस्थेला आपल्या वांङमयाच्या व्दारे दिशा देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे चरित्र व चारित्र्य आदर्शवत आहे. संत एकनाथांचे व्यक्तिमत्त्व महान होते ते भागवत धर्माचे प्रभावी यशस्वी प्रचारक होत. भागवत धर्माच्या अधारे समाजाला खरी माणुसकी शिकविली. आपल्या वांङमयातून जे जे योग्य आहे ते ते देण्याचा सात्विक प्रयत्न केला. भागवत धर्मातील समतेच्या शिकवणुकीचा उदघोष आपल्या साहित्यातुन केवळ सामाजिक दुर्गुनांच्या निर्मुलनासाठी केला. प्रपंच करता करता उत्तम परमार्थ साधता येतो याचे मुर्तिमंत उदाहरण म्हणजे संत एकनाथ होय. एक संशोधक वृत्तीचा प्रेमळ हृदयाचा उत्कट भावाविष्कार लाभलेला हा संत आपल्या बहुविध रचनेतुन आजही समाजाला शिक्षित करीत आहे. संत तुकारामांनी आपल्या अभंगवाणीतून समाजाला रोखठोक विचार, आचार दिले आहेत. संत तुकाराम म्हणजे आधी केले मग सांगितले. अधिकार तैसा करु उपदेश म्हणणारे तुकाराम सर्वांना जवळचे वाटतात. आपलेसे वाटतात. त्याचे कारण ते सहहृदयी वाटतात. भक्ती सारखे दुसरे सोपे साधन नाही. म्हणून त्यांनी भक्ती करा असा सोपा उपदेश दिला. तुकाराम महान संत वाटतात. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले. असे म्हणणारे तुकाराम परखड, रोखठोक, प्रेमळ वृत्तीचे वाटतात. त्यांनी समाजाला माणूसकी,

दया, क्षमा, शांती शिकविली. समर्थ रामदासांनी आपल्या आचार विचारातुन शिकवणूकीतून, उपदेशातून माणसाला संसारात राहून परमार्थ कसा करता येतो. ते साध्या सोप्या भाषेतून आपल्या दास बोधातून सांगितले आहे. मनूष्य स्वःताला विसरला आहे. त्यांने स्वचा म्हणजे आत्म्याचा शोध घ्यावा. त्यासाठी नामस्मरण, चिंतन महत्त्वाचे आहे. त्यानेच स्वःताचा उध्दार होणार आहे. त्यासाठी प्रत्येक मनूष्याने आपल्या जीवनाचे सार्थक करुन घेण्यासाठी सदगुरुचा शोध घेतला पाहिजे. सदगूरु विना जन्म व्यर्थ आहे. तसेच समर्थानी मनुष्य जन्माला आलाय कशासाठी, करतोय काय, आणि जायचे कुठे हे त्याला ठाऊक नसल्यामुळे स्वःताची स्वःताच फसगत करुन घेतली आहे. म्हणून प्रत्येकाने चांगल्या संगतीची कास धरली पाहिजे. अतिशय साध्या सोप्या भाषेतून आपल्या दास बोध या ग्रंथातून मनाला रुचेल, पचेल, आवडेल आशा भाषेतून शिकवण दिली आहे. विश्व कल्यानाची तळमळ त्यांनी व्यक्त केली आहे. प्रत्येक माणसाचे कल्याण व्हावे तो अधोगतीला न जाता त्याची उत्तरोउत्तर प्रगती व्हावी. असे समर्थांना मनोमन वाटते.

**समारोप –**

व्यापक, सर्वांना बरोबर घेऊन सोपी साधना सांगणारा वारकरी संप्रदायासारखा दुसरा संप्रदाय नाही. लोक जागृती करीत हरीभजन करीत अध्यात्माचा संदेश दिला. आपल्या अभंगातून सर्वच संतांनी हरिभक्ती सांगितली. आत्मशुध्दी भूतदया परोपकार नाम माहात्म्य, समभाव, कर्तव्यनिष्ठा जीवननिष्ठा मुल्ये सांगितली संतांनी यज्ञयाग, व्रवैकल्ये यांचा निषेध करुन कर्मकांडाला मुठमाती देऊन सर्वांना सहज सुलभ सोपा असा भक्ती मार्ग सांगितला. सर्व संतानी आत्म उध्दाराबरोबर समाज उध्दाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ठ सुख, समाधन, चिरशांती ही ईश्वर चिंतनातच असते असे सांगितले. कोणताही संकल्प सिध्दीस जावयाचा असेल तर काया, वाचा, मन एक केल्याशिवाय मनाची एकाग्रता, तल्लिनता आणि एकरुपता साध्य होत नाही सर्व संतानी साऱ्या समाजाला खऱ्या मानुसकीची ओळख करुन दिली जे जे योग्य आहे ते ते देण्याचा सात्वीक प्रयत्न केला आहे. मानव जातीला मानव धर्माची शिकवण दिली. मानवाला सन्मार्गाला लावले शिवाय सांस्कृतीक, सामाजिक आर्थिकते बरोबरच शेती निष्ठता, कृषी संस्कृती यांचे महत्त्व सांगितले आज संतांच्या अभंगातुन वरील विचार लोकांपर्यंत पोहचविण्याचे महान कार्य आधुनिक काळात सुध्दा लोकांना उपकारक व महत्त्वाचे वाटते. थोडक्यात मला असे वाटते की, आज संतांच्या आचाराची, विचाराची, शिकवणूकीची माणसाला अन्न, वस्त्र, निवारा याप्रमाणे खरी गरज आहे. प्रत्येकांने संतांचे विचार अचरणात आणणे गरजेचे आहे. त्याशिवाय माणसाचा माणुसकीचा उध्दार होणार नाही. ऐवढेच नव्हेतर माणसाच्या जीवनाचे खरे गमक किंवा फलश्रुती संतांच्या आचारा विचारात सामावलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास - ल. रा. नसिराबादकर .

२) मध्ययुगीन मराठी वाङमयाचे स्वरुप - स्नेहवर्धन प्रकाशन पुणे

३) संत साहित्याची फलश्रुती - गं. बा. सरदार

४) तुकाराम दर्शन - डॉ. सदानंद मोरे

५) पाच संत कवी - शं. गो. तुळपुळे

६) प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास - प्र. न. जोशी

७) प्राचीन मराठी वाङ मयाचा इतिहास - भाग दुसरा अ.ना. देशपांडे